भूमी संपादन, पुनवर्सन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील एकूण १३ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक ३१.०८.२०२६ (६ महिने) पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- आरपीए-२०२६/प्र.क्र.ई- १६२१३४४/पुनर्वसन-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १९ मे , २०२६.

**वाचा:-**

१. शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, दिनांक ११.०९.२०१९.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक आरपीए-१४१५/प्र.क्र.४५/र-१, दिनांक २८.०२.२०२०.
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए-२०२४/प्र.क्र.७५/र-१, दिनांक ०१.१०.२०२४
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक आरपीए-२०२१/ प्र.क्र.७५/ई-१३६६९०२ दि.१६.१०.२०२५
५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दिनांक २८.०२.२०२६
६. निबंधक, भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. जा.क्र.२०२६/भ.पु.पु.प्रा./लेखा/कावी-१३८, दिनांक ०९.०४.२०२६

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा नवीन अधिनियम भूमीसंपादन व पुनर्वसन यासाठी एकत्रितपणे पारित केला आहे. या अधिनियमातील कलम ५१ नुसार शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, दिनांक ११.९.२०१९ अन्वये छत्रपती संभाजीनगर येथे कोकण, नाशिक, पुणे व छत्रपती संभाजीनगर या विभागांसाठी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर प्राधिकरणाकरिता महसूल वे वन विभाग, शासन निर्णय दिनांक २८.२.२०२० अन्वये १३ पदांची निर्मिती करण्यात आली आहे. शासन अधिसूचना दिनांक १६.०८.२०२४ अन्वये छत्रपती संभाजीनगर येथील भूमी संपादन, पुनवर्सन आणि पुनर्स्थापना प्राधिकरणाचे अधिकारक्षेत्र छत्रपती संभाजीनगर विभागापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे.

२. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक २८.०२.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ठ असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक.०१.०३.२०२६ ते

दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील एकूण १३ अस्थायी पदांना वरील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची वाव शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील विवरणपत्रामध्ये नमूद एकुण १३ अस्थायी पदांना दिनांक १६.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक २८.०२.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०२.२०२६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अटीच्या अधिन राहून व प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील विवरणपत्रामध्ये नमूद अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांवर होणारा खर्च मागणी क्र. मुख्यलेखाशिर्ष- २२३५C४४८ मधील वेतन उपलेखाशिर्ष ०१ व उपलेखाशिर्ष-१० अंतर्गत सन २०२६- २०२७ च्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय हा वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/ प्र.क्र.८/१६/ आ.पु.क. दिनांक २८.०२.२०२६ मधील प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५१९११४५५८६४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SANJAY MAROTI JAGTAP

Digitally signed by SANJAY MAROTI JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=9EA94B7D58FC204D63A497943E6C56976C537462D5F2964980C30906051D44D7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2C1FC771D686D36A26A8AF979409826984378A73F9D4AEECA990209686CC25BD, cn=SANJAY MAROTI JAGTAP
Date: 2026.05.19 11:47:08 +05'30'

**(संजय जगताप)**
**कक्ष अधिकारी , महसूल व वन विभाग**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
२. निबंधक, तहसिलदार, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर.
३. महालेखापाल लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता - नागपूर
४. जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
५. वित्त विभाग (आपुक कक्ष), मंत्रालय, मुंबई.
६. कार्यासन अधिकारी (ब-१, / ई-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती (पुनर्वसन-१)

*********

# <u>विवरणपत्र</u>

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
| --- | --- | --- | --- |
| १ | मा. पीठासीन अधिकारी (जिल्हा न्यायाधीश) | J-५(१४४८४०-१९४६६०) | १ |
| २ | निबंधक (तहसिलदार संवर्ग) | S-१९ (५५१००-१७५१००) | १ |
| ३ | लघुलेखक (नि.श्रे.) | S-१५ (४१८००-१३२३००) | १ |
| ४ | कार्यकारी सहायक (सहायक महसूल अधिकारी/अव्वल कारकून ) | S-१२(३२०००-१०१६००)/ S-१४(३८६००-१२२८००) | २ |
| ५ | कार्यकारी सहायक (महसूल सहायक /लिपिक) | S-०६ (१९९००-६३२००)/ S-१२(३२०००-१०१६०० | ४ |
| ६ | वाहन चालक (बाहयस्त्रोत) | १५००० | १ |
| ७ | शिपाई (बाहयस्त्रोत) | १२००० | ३ |
| **एकूण पदे** | | | १३ |